प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहराचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २०.०२.२०२०**

**आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्स नवी मुंबईचे भूषण ठरेल - श्री. एकनाथ शिंदे**

"नवी मुंबईमध्ये साकारण्यात येत असलेल्या अन्य आंतरराष्ट्रीय प्रकल्पांबरोबरच विस्तारित १८ होल्सचे आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्सही नवी मुंबईचे भूषण ठरेल, याबाबत कोणतीही शंका नाही", असे उद्गार श्री. एकनाथ शिंदे, मंत्री, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांनी काढले. सिडको मास्टर्स कप - २०२१ गोल्फ सामन्याचे उद्घाटन आणि ०९ होल्सच्या खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचा १८ होल्सच्या गोल्फ कोर्समध्ये विस्तार आणि आधुनिक सुविधांसह कंट्री क्लब विकसित करण्याच्या आराखड्यांचे अनावरण करतेवेळी त्यांनी हे उद्गार काढले. सामाजिक अंतरासह कोविड-१९ सुरक्षाविषयक नियमांचे पालन करून हा कार्यक्रम पार पडला.

या प्रसंगी **श्री. हेमंत नगराळे,** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, **डॉ. संजय मुखर्जी,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. बिपिनकुमार सिंग,** पोलीस आयुक्त, नवी मुंबई, **डॉ. कैलास शिंदे,** सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, सुप्रसिद्ध टेनिसपटू **श्री. लिएंडर पेस** आणि सिडकोतील विभाग प्रमुख हेही उपस्थित होते.
श्री. एकनाथ शिंदे यांनी या वेळी बोलताना सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना, कॉर्पोरेट पार्क आणि विस्तारित गोल्फ कोर्स हे राज्याच्याच नव्हे तर देशाच्या नगर विकास क्षेत्राला नवीन दिशा देणारे ठरून, राज्याच्या व देशाच्या आर्थिक विकासातही मोलाचे योगदान देणारे ठरतील, असे प्रतिपादन केले.

डॉ. संजय मुखर्जी यांनी "१८ होल्सचे गोल्फ कोर्स तसेच कॉर्पोरेट पार्क प्रकल्पा अंतर्गत विश्वचषक फुटबॉल आणि इतर आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी साकारण्यात येणाऱ्या सेंटर ऑफ एक्सलन्समुळे खारघर नोड भविष्यात 'स्पोर्टस हब' म्हणूनही उदयाला येणार आहे. गोल्फ कोर्स हे नवी मुंबईतील एक आयकॉनिक स्थळ बनणार आहे ", असा विश्वास व्यक्त केला. खारघर हा नवी मुंबईतील सर्वांत विस्तीर्ण नोड असून नजीकच्या काळात खारघर व परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ, एरो सिटी, परिवहन केंद्रित गृहनिर्माण योजना, मेट्रो रेल्वे, आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क, मेडी सिटी, सेंटर फॉर एक्सलन्स, खारघर हिल्स प्लेट्यु असे महत्त्वाचे प्रकल्प साकार होणार असल्याने हा नोड निवासी, वाणिज्यिक, परिवहन व सांस्कृतिक सुविधांनी परिपूर्ण असणार आहे.

गोल्फसारख्या प्रतिष्ठीत खेळाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामने आयोजित करून राज्याच्या व देशाच्या पर्यटनास चालना देण्याच्या उद्देशाने सिडकोतर्फे खारघर नोडमध्ये **52** हेक्टरवर खारघर व्हॅली गोल्फ कोर्स मैदान विकसित करण्यात आले आहे. विस्तीर्ण हिरवीगार जमीन, पार्श्वभूमीला खारघर परिसरातील हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा आणि या डोंगररांगांवरून वाहत येणारे लहानमोठे जलप्रपात, या निसर्गसौंदर्याचा कल्पकतेने वापर करून खारघर येथील गोल्फ कोर्स मैदान विकसित करण्यात आले आहे. गोल्फ कोर्समध्ये सिडकोचा मॅग्नम-ओपस गोल्फ व कंट्री क्लब, **72** पार व **7,137** यार्डचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे **9** होल्सचे गोल्फ कोर्स यांचा समावेश होतो. लवकरच **9** होल्सच्या गोल्फ कोर्सचा **18** होल्सच्या गोल्फ कोर्समध्ये विस्तार करण्यात येणार असून त्याचबरोबर क्लब हाउससह पूर नियंत्रणासाठी डिटेन्शन पॉन्ड, निवासी वापरासाठी आलीशान व्हीला, पंचतारांकित उपहारगृह, निवासी वापरासाठी अपार्टमेन्ट/बंगले या सुविधाही विकसित करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. कैलास शिंदे यांनी केले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**